# महाराष्ट्र विधानसभा
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ३१ जुलै, २०१३
## (सकाळी १०.०० ते १०.४५ वाजेपर्यंत)

**अर्धा-तास चर्चा (म.वि.स. नियम ९४ अन्वये) :-**

**(मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दाखविण्यात आलेल्या परंतु प्रलंबित असलेल्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना) (क्रमांक १ ते १२)**

**(१) श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.**

**"महावीज निर्मिती कंपनीस निकृष्ट दर्जाचा कोळसा पुरविण्यात येत असल्याबाबत"** या विषयावरील **श्री.चंद्रशेखर बावनकुळे व इतर वि.स.स.** यांच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ४५० मधील प्रश्न क्रमांक ८१४७५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(२) श्री.राजन विचारे, वि.स.स.**

**"ठाणे जांभळीनाका येथे रिकाम्या असलेल्या जागेत फेरीवाल्यांनी अनधिकृतपणे केलेले अतिक्रमण"** या विषयावरील **श्री.राजन विचारे व इतर वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १००७२० ला दिनांक १९ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(३) श्री.उमाजी बोरसे, वि.स.स.**

**"राज्यात जकात कर रद्द करुन त्याऐवजी स्थानिक स्वराज्य संस्था कर लागू करण्याबाबत"** या विषयावरील **श्री.विलास लांडे व इतर वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ९८०६७ ला दिनांक २६ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(४) श्री.एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), वि.स.स.**

**"नागपूर शहरातील मौजा सोमलवाडा येथील मिलिंद गृहनिर्माण सहकारी संस्था येथील भूखंडधारकांना अधिग्रहणाचा खर्च व इतर खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत"** या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १०१६२८ ला दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(५) **श्री. रविंद्र चव्हाण, वि.स.स.**

**"मोझरी अमरावती येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जन्म शताब्दी निमित्त मुलभूत सुविधा निर्माण करण्याबाबत"** या विषयावरील **कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स.** यांच्या दिनांक १३ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ४७९ मधील प्रश्न क्रमांक ८३७२९ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(६) **श्री. योगेश सागर, वि.स.स.**

**"चंद्रपूर जिल्ह्यातील सावली, नागभिड व सिंदेवाही तालुक्यात वाघाने ठार केलेल्या व्यक्तींना व जखमींच्या नातेवाईकांना वन विभागाने योग्य तो मोबदला न दिल्याबाबत"** या विषयावरील **श्री. अतुल देशकर, वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ९२९३१ ला दिनांक १९ डिसेंबर, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(७) **श्री. गोपाळ शेट्टी, वि.स.स.**

**"नागपूर शहरातील विकास योजनेतील हरितपट्टयातील अंतर्गत असलेले भूखंड गुंठेवारी अधिनियम, २००१ नुसार कार्यवाही करण्याबाबत"** या विषयावरील **श्री.देवेंद्र फडणवीस व इतर वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १०१६२३ ला दिनांक १२ मार्च, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(८) **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.**

**"चंद्रपूर जिल्ह्यातील हुमन नदी प्रकल्पाच्या नेट प्रेझेंट व्हॅल्युच्या रकमेमध्ये वाढ झाल्याबाबत"** या विषयावरील **श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक ७९३८१ ला दिनांक २५ जुलै, २०१२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(९) **श्री.गोवर्धन शर्मा, वि.स.स.**

**"राज्यातील महामार्गावरील टोल वसुलीतून जनतेची लूट होत असल्याबाबत"** या विषयावरील **श्री.भिमराव तापकीर, वि.स.स.** यांच्या दिनांक २१ डिसेंबर, २०१२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५१२ मधील प्रश्न क्रमांक ८४९८६ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

(१०) **डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.**

**"नागपूर पोलीस आयुक्तालयात परिवहन विभागात झालेला ४० लाखांचा गैरव्यवहार"** या विषयावरील **श्री. आर. एम. वाणी, वि.स.स.** यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५४७ मधील प्रश्न क्रमांक ९२०२७ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(११) श्री.भिमराव तापकीर,वि.स.स.**

**"चंद्रपूर-वरोरा या ४० कि.मी. रस्त्याच्या चौपदरीकरणाचे काम निकृष्ट दर्जाचे करण्यात आल्याबाबत"** या विषयावरील **श्री.नानाजी शामकुळे, वि.स.स.** यांच्या तारांकित प्रश्न क्रमांक १११५७२ ला दिनांक २४ जुलै, २०१३ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(१२) श्री.कृष्णा खोपडे,वि.स.स.**

**"नागपूर सुधार प्रन्यासला शासनाकडून देण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काच्या रकमेबाबत"** या विषयावरील **श्री.दिनानाथ पडोळे व इतर वि.स.स.** यांच्या दिनांक १८ एप्रिल,२०१३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या यादी क्रमांक ५५१ मधील प्रश्न क्रमांक ७९०७१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात अर्धा-तास चर्चा उपस्थित करतील.

**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : प्रश्नोत्तरे.**

**(अ)** (१) मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला कॅप्टन अभिजीत अडसूळ, वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११६२७४ **"मध्य मुंबईतील परळ, भोईवाडा, जेरवाई वाडीया रोड येथील जागेवर १६ मजल्यांचे बांधकाम करण्याचा विकास करारनामा असतानाही २३ मजल्यांचे बांधकाम करण्यात आल्याबाबत".**

(२) मंगळवार, दिनांक ३० जुलै, २०१३ रोजी उत्तरित झालेल्या तारांकित प्रश्नोत्तरांच्या यादीतील मा.अध्यक्षांच्या निदेशानुसार राखून ठेवण्यात आलेला प्रा.राम शिंदे व इतर वि.स.स. यांचा तारांकित प्रश्न क्रमांक ११३९९८ **"मुंबई महानगरपालिकेच्या विविध करापोटी येणी असलेली थकबाकी वसूल केली नसल्याबाबत".**

**(ब)** तारांकित प्रश्न.

**(क)** अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी क्रमांक ५९२ ते ६०४ सभागृहाच्या पटलावर ठेवणे.

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे -**

**(१) मुख्यमंत्री** : मुंबई महानगर प्रदेश लोखंड व पोलाद बाजार समिती, कळंबोली यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा पंचवीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (२) | **उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री** | : | | दिनांक १ एप्रिल, २०१२ ते ३१ मार्च, २०१३ या कालावधीत शासनाच्या वेगवेगळ्या विभागांतर्गत संस्था, उपक्रमांनी घेतलेल्या कर्ज, कर्जरोखे व त्यावरील व्याजास देण्यात आलेल्या हमीविषयीचे विवरणपत्र सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |
| (३) | **सामाजिक न्याय मंत्री** | : | (अ) | महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ मर्यादितचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ब) | शामराव पेजे कोकण इतर मागासवर्ग आर्थिक विकास महामंडळ मर्यादितचा सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या वर्षांचा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (४) | **संसदीय कार्य मंत्री** | : | | विधानसभेच्या सन २०१३ च्या पहिल्या (अर्थसंकल्पीय) अधिवेशनात मा.मंत्री/मा.राज्यमंत्री महोदयांनी विधानसभा सभागृहात दिलेल्या एकूण ५५७ आश्वासनांची यादी आणि विधानसभेचे सन १९९१ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन ते सन २०१३ चे पहिले (अर्थसंकल्पीय) अधिवेशन या कालावधीत विधानसभा सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनांपैकी एकूण ११५४ आश्वासनांच्या पूर्ततेबाबतच्या माहितीच्या विवरणपत्रांची यादी सभागृहाच्या पटलावर ठेवतील. |
| (५) | **जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) मंत्री** | : | (अ) | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक लेखा अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (ब) | महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा अलग लेखा परीक्षा अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| | | | (क) | कोंकण पाटबंधारे विकास महामंडळ, ठाणे यांचा सन २०११-२०१२ या वर्षाचा वार्षिक वित्तीय अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |
| (६) | **उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** | : | | उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव यांचा सन २००९-२०१० या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल सभागृहासमोर ठेवतील. |

**तीन : विशेषाधिकार भंगाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स.नियम २७३ अन्वये).**

**चार : स्थगन प्रस्तावाच्या सूचना - (असल्यास) (म.वि.स. नियम ९७ अन्वये).**

**पाच : औचित्याचे मुद्दे - (असल्यास)**

**सहा : सर्वश्री विजय वडेट्टीवार, सुभाष धोटे, बच्चू कडू, दिनानाथ पडोळे, प्रा. विरेंद्र जगताप, श्री. सुनिल केदार, डॉ. नामदेव उसेंडी, सर्वश्री. सुभाष झनक, विजय खडसे, केवलराम काळे, प्रकाश डहाके, वामनराव कासावार, रावसाहेब शेखावत, ॲड. यशोमती ठाकूर, सर्वश्री. अनिल बावनकर, आनंदराव गेडाम, सुरेश जेथलिया, एकनाथराव खडसे (पाटील), बाळा नांदगावकर, नाना पटोले, देवेंद्र फडणवीस, विजयराज शिंदे, ॲड आशिष जयस्वाल, डॉ. संजय कुटे, डॉ. खुशाल बोपचे, डॉ. संजय रायमुलकर, श्री. दादाराव केचे वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २९३ अन्वये प्रस्ताव :-**

"राज्यात मराठवाडयात व विदर्भात विशेषतः चंद्रपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, अमरावती व वाशिम या जिल्हयात माहे जुलै, २०१३ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे १५०० मि.मी. पावसाची नोंद होऊन हजारो शेतकरी उद्ध्वस्त होणे, लाखो हेक्टर जमिनीवरील पिके नष्ट होणे, जमिनी खरडून गेल्यामुळे पुढील किमान पाच वर्षापर्यंत या जमिनींच्या उत्पादन क्षमता कमी होण्याची निर्माण झालेली भीती, या नैसर्गिक आपत्तीमुळे विदर्भातील असंख्य घरे कोसळून झालेली जिवित व मालमत्तेची हानी, शेतकऱ्यांनी कर्ज काढून दुबार तिबार पेरणी केलेली संपूर्ण पिके नष्ट होणे, पुरामध्ये असंख्य जनावरे वाहून जाणे, त्यामुळे शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपयांचे झालेले नुकसान, मंठा तालुका (जि.जालना) येथील देवठाणा व अवलगाव ही दोन गावे नदीच्या काठावर असल्यामुळे या गावांना प्रत्येक पावसाळ्यात धोका निर्माण होत असल्यामुळे या गावातील ग्रामस्थांनी संबंधित शासकीय कार्यालयात पुनर्वसनाची वारंवार मागणी करूनही त्यांचे पुनर्वसन सुरक्षित ठिकाणी न झाल्यामुळे पसरलेला असंतोष, मंठा तालुक्यातील तळणी, मंठा शहर, देवठाणा अवलकाव, शिरपूर, बेलोरा, वझर सरकटे, तळतोडी, माळतोंडी, हेलह, लिंबे-वडगाव, ढंगे-वडगाव, गडदेपांगरा इत्यादी गावांमध्ये पावसामुळे आवाक्याबाहेर गेलेली स्थिती, शासनाकडून अद्यापही कोणतीही मदत अथवा सानुग्रह अनुदान न पोहचल्याने शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली तीव्र नाराजी, नैसर्गिक आपत्तीला तोंड देण्यासाठी अथवा तिचा मुकाबला करण्यासाठी विदर्भातील तसेच मराठवाडयातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक सहाय्य देणे तसे ओला दुष्काळ जाहीर करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**( दुपारी १.३० ते २.०० वाजेपर्यंत- मध्यंतर )**

**सात : लक्षवेधी सूचना (म.वि.स. नियम १०५ अन्वये) :-**

(१) **श्री. संजय (बंडू) जाधव, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"परभणी येथील मराठवाडा कृषि विद्यापीठासाठी सन १९७२ ते ७८ या काळामध्ये बलसा, शेंद्रा, सायळा, रायपूर, खानापूर, टाकळगव्हाण इत्यादी गावातील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्यात येणे, जमिनी संपादन केलेल्या प्रकल्पग्रस्तांना कृषि विद्यापीठात नोकऱ्या देणे बंधनकारक असणे, कृषि विद्यापीठांच्या सेवेत घेण्यासाठी वारंवार आंदोलने करून प्रकल्पग्रस्तांनी शासनाचे लक्ष वेधणे, शासनाच्या कृषि विभागाने त्यांच्या दिनांक ३१ जुलै, २००९ रोजीच्या पत्रान्वये प्रकल्पग्रस्तांच्या भरतीबाबत राज्यातील सर्व कृषि विद्यापीठांना आदेश देणे, सदर आदेशानुसार राज्यातील राहुरी कृषि विद्यापीठाने ५० टक्के प्रकल्पग्रस्तांना नोकऱ्या उपलब्ध करून देणे, परंतु परभणी कृषि विद्यापीठाने प्रकल्पग्रस्तांच्या नियुक्त्या करण्यासाठी विलंबाचे धोरण अवलंबणे, परभणी कृषि विद्यापीठात सुमारे ४० ते ४५ टक्के जागा रिक्त असणे व प्रकल्पग्रस्तांची संख्या सुमारे ५०० च्या आसपास असणे, परभणी कृषि विद्यापीठाने प्रकल्पग्रस्तांच्या २३१ जागा भरण्यासाठी लेखी परीक्षा घेऊन त्याचा निकालही जाहीर करणे, तथापि, नियुक्त्यांचे आदेश उमेदवारांना देण्यामध्ये विलंब करणे, त्याच दरम्यान राज्य शासनाने प्रकल्पग्रस्तांच्या जागा भरण्यासाठी निर्बंध जाहीर करणे, नियुक्तीचा आदेश न निघाल्यामुळे प्रकल्पग्रस्तांवर अन्याय होणे, प्रकल्पबाधित उमेदवारांनी दिनांक १८ ते २२ फेब्रुवारी, २०१३ या पाच दिवसांच्या कालावधीत विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारतीसमोर आमरण उपोषण करणे, प्रकल्पग्रस्ताच्या मागणीकडे मा.कृषि मंत्री, सामान्य प्रशासन राज्यमंत्री, कृषि विभाग इत्यादींनी केलेले दुर्लक्ष, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची सेवेत घेण्याची दीर्घकालची प्रलंबित मागणी, या संदर्भात शासनाने त्वरित करावयाची कार्यवाही व भूमिका."

(२) **सर्वश्री सुधाकर देशमुख,** देवेंद्र फडणवीस, कृष्णा खोपडे, विकास कुंभारे, जितेंद्र आव्हाड, विलास लांडे, लक्ष्मण जगताप, बापूसाहेब पठारे, कृषिभूषण साहेबराव पाटील, मंगेश सांगळे, बाळा नांदगांवकर, नितीन भोसले, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, डॉ.सुधाकर भालेराव, सर्वश्री.नाना पटोले, एकनाथराव खडसे (पाटील), अबू आजमी, शरद गावित, रशीद मोमीन, डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री.महादेव बाबर, कुमार आयलानी, नवाब मलिक, रमेश थोरात, अब्दुल सत्तार, राजहंस सिंह, अमीन पटेल, बाबा सिद्धीकी, अस्लम शेख, **वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजाकि महत्वाच्या बाबीकडे **अल्पसंख्याक विकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"राज्यात २३,५६६ संस्था वक्फ बोर्डाकडे नोंदणीकृत असणे, तसेच ३७,३३० हेक्टर जमीन उपलब्ध असणे, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाचे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांना ३५,०००/- रुपयांची लाच घेताना झालेली अटक, तीन राज्यांतील कोट्यावधींची संपत्ती जप्त करण्यात येणे तसेच त्यांच्या निवासस्थानी वक्फच्या जमिनीसंबंधातील संशयास्पद कागदपत्रे सापडणे, बोर्डाच्या मालमत्तांचा भाडे करार वाढविणे, रद्द करणे वा नवे करार करणे आदी निर्णयांचे अधिकार तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री.एन.डी.पठाण यांना नसतानासुद्धा निर्णय घेणे, तीन वर्षांपूर्वी मुख्य दक्षता आयुक्तांनी पंतप्रधान कार्यालयास वक्फ बोर्डातील गैरव्यवहारासंदर्भात घोटाळ्यांची चौकशीची मागणी करणे, वक्फच्या गत २५ वर्षातील कारभाराची सीबीआय चौकशीची मागणी लोकप्रतिनिधींकडून वारंवार करण्यात येणे, राज्यातील मुस्लिम समाजाने वक्फकरिता दिलेल्या जमिनींना या अधिकाऱ्यांकडून संगनमताने ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणे, तसेच राज्यात वक्फ बोर्डाची हजारो एकर जागा असणे व यासंदर्भात वक्फ बोर्डाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यामार्फत गैरव्यवहार सुरु असणे, परिणामी संपूर्ण राज्यातील जनतेमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, संतापाची भावना, याबाबत तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री.एन.डी.पठाण यांच्याविरुद्ध सीबीआय चौकशी करण्याबाबत लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **श्री.संजय वाघचौरे,** ॲड.अशोक पवार, सर्वश्री दिपक चव्हाण, गुलाबराव देवकर**, वि.स.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"औरंगाबाद येथील जायकवाडी धरणाच्या नाथसागर जलाशयाचे क्षेत्र ३५,००० हेक्टर असणे, पिण्याचे पाणी, शेती, सिंचन व मासेमारीच्या उद्देशाने तयार करण्यात आलेल्या जायकवाडी प्रकल्पात सुरुवातीच्या काळात नाथ सागरातून प्रतिदिन सुमारे ४०० ते ५०० टन मासे मिळून मच्छिमारांचा व्यवसाय जोमात चालत असणे, मात्र माहे जून, १९८३ मध्ये शासनाने हा जलाशय महाराष्ट्र मत्स्योद्योग मंडळाकडे हस्तांतरीत करण्यात येणे, सन १९८३ ते १९९६ अखेरपर्यंत महामंडळाने नाथसागर जलाशयात मच्छिमारी करणाऱ्यांकडून रॉयल्टीच्या रुपात महामंडळास लाखो रुपयाचा महसूल मिळणे, मात्र तद्नंतर महामंडळाने सदर मच्छिमारीचा ठेका एका खाजगी कंपनीस दिला असता मुख्य वनसंरक्षक, वन्यजीव यांनी पक्षी अभयारण्याचे कारण दाखवून जलाशयात मासेमारीला बंदी आणण्यात येणे, परिणामी औरंगाबाद व नगर जिल्ह्यातील २७ मच्छिमारी संस्थामार्फत करण्यात येणाऱ्या मच्छिमारांच्या उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण होणे, याबाबत नाथसागर (जायकवाडी जलाशय) वरील बंदी उठविण्याची तसेच राष्ट्रीय विकास बोर्ड, हैद्राबाद यांचेकडून मत्स्यबीज संचयनासाठी निधी उपलब्ध करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**आठ : शासकीय विधेयक :-**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे :-**

(क) **सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३.**

(ख) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुधीर मुनगंटीवार, गिरीश महाजन, प्रा.अतुल देशकर, सुरेश हाळवणकर, गिरीश बापट, श्रीमती माधुरी मिसाळ, श्री.भिमराव तापकीर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२३ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ग) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.देवेंद्र फडणवीस, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२२ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(घ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.महादेव बाबर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३२१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(च) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रविंद्र वायकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३१५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(छ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.खुशाल बोपचे, सर्वश्री नाना पटोले, प्रकाश शेंडगे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ज) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.सुभाष देसाई, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २५५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(झ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ट) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अनिल राठोड, विजय औटी, चंद्रकांत मोकाटे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २१० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ठ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री नानाजी शामकुळे, विजय घोडमारे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या २०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ड) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री विनोद घोसाळकर, प्रकाश (बाळा) सावंत, प्रा.शरद पाटील, श्री.चिमणराव पाटील, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ढ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री बबनराव घोलप, धनराज महाले, अनिल कदम, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या १०० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ण) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री राजन विचारे, दौलत दरोडा, रुपेश म्हात्रे, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ९१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(त) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.विवेक पंडित, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८८ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(थ) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री सुर्यकांत दळवी, सदानंद चव्हाण, भरतशेठ गोगावले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ८१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(द) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री आर.एम.वाणी, अशोक काळे, संतोष साबंरे, श्रीमती मिराताई रेंगे-पाटील, सर्वश्री संजय शिरसाठ, ज्ञानराज चौगुले, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ६१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(ध) **विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत ॲड. आशिष जयस्वाल, कॅ.अभिजित अडसुळ, डॉ.संजय रायमुलकर, वि.स.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०१३ चे विधानसभा विधेयक क्रमांक २६ - महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानपरिषदेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४१ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**विधान भवन,**
मुंबई.
दिनांक : ३० जुलै, २०१३.

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.